महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांच्या वाहन चालकाच्या ठराविक वेतनात (पारिश्रमिक) वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग,
शासन आदेश क्रमांक : सुविधा-०३२६/प्र.क्र. १२/२/दोन,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १८ ऑगस्ट, २०२६.

वाचा :- शासन निर्णय, संसदीय कार्य विभाग क्रमांक सुविधा-२०२२/प्र.क्र. २०/दोन, दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधान मंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियमाच्या कलम ६ (६) मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांना त्यांच्या पदाची कार्ये अधिक परिणामकारकपणे पार पाडता यावीत यासाठी विधानमंडळ सदस्यांना वाहन चालकाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. यापूर्वी दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये, विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांच्या वाहन चालकांचे ठराविक वेतन (पारिश्रमिक) रुपये १५,०००/- प्रतिमाह वरुन रूपये २०,०००/- प्रतिमाह इतके अनुज्ञेय करण्यात आले आहे.

आता महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते संयुक्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार, विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांच्या वाहन चालकांचे ठराविक वेतन (पारिश्रमिक) रुपये २०,०००/- प्रतिमाह वरुन रूपये ३०,०००/- प्रतिमाह इतके अनुज्ञेय करण्यास मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांच्या वाहन चालकांच्या ठराविक वेतनात (पारिश्रमिकात) वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र विधान मंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियमाच्या कलम ६ (६) मधील तरतुदींतर्गत, या शासन आदेशाद्वारे, दिनांक १ ऑगस्ट, २०२६ पासून विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांच्या वाहन चालकाचे ठराविक वेतन (पारिश्रमिक) रुपये २०,०००/- प्रतिमाह वरुन रूपये ३०,०००/- प्रतिमाह इतके अनुज्ञेय करण्यात येत आहे.

२. विधानमंडळाच्या विद्यमान सदस्यांकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या वाहन चालकास "महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (वाहन चालकांची नेमणूक) नियम, २०२१" लागू राहतील.

३. सदर सुविधेची अंमलबजावणी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयामार्फत करण्यात येईल आणि सदर सुविधेवर होणारा खर्च हा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात येईल.

४. प्रस्तुत शासन आदेश वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक अनौप ४५१/व्यय-४, दिनांक २३.०७.२०२६ (E-१७७५००९) अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८१८१६१००३९५१५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ASHOK GAJANAN VAIDYA

Digitally signed by ASHOK GAJANAN VAIDYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PARLIAMENTRY AFFAIRS DEPARTMENT,
2.5.4.20=f3818ea1e925396f0e66ea1a069eb1301794249e08873d9197d2aabe3df78b43, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C9B9161EBD287BC2EF551110837206D5E6509B29BD561332B50E09BA83459EED, cn=ASHOK GAJANAN VAIDYA
Date: 2026.08.18 16:11:02 +05'30'

(अशोक ग. वैद्य)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१) महालेखापाल — १ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , मुंबई.
२) महालेखापाल — २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , नागपूर.
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
५) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
८) मा. सभापती/ मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-४०० ०३२
९) मा. अध्यक्ष/ मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई- ४०० ०३२.
१०) मा. मंत्री व राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
११) मा. मंत्री, संसदीय कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१२) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद / महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
१३) सर्व मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद व महाराष्ट्र विधानसभा, (महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयामार्फत)
१४) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१५) प्रधान सचिव, (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१६) सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई- ४०० ०३२.
१८) सहसचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१९) सहसचिव, वित्त विभाग (व्यय -४), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२०) कक्ष अधिकारी (व्यय -४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२१) निवडनस्ती.